# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र

Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

## प्रवेश सूचना २०२३-२४

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त बी.ए.,बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र) एम.कॉम., एम.एस्सी.(गणित) या दूरशिक्षण अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चे प्रवेश अर्ज दि.२२.६.२०२३ ते दि.३१.७.२०२३ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्ज http://www.unishivaji.ac.in/online_portal/ या संकेतस्थळावर **Fresh Distance Students Registration 2023-24** https://sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/ लिंकवरून ऑनलाईन पध्दतीने सादर करणेचे आहेत.

विद्यार्थीनी प्रवेश अर्ज भरताना व सादर करताना प्रवेश व संदर्भातील सर्वसाधारण सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. इच्छुक विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम **Registration** मधील आवश्यक माहिती अचूक पध्दतीने (शेवटच्या परीक्षेत असलेप्रमाणे नाव) सादर करून आपले युझर आयडी व पासवर्ड देवून युझर आयडी तयार करणे आवश्यक आहे.

२. सदर **Registration** झालेनंतर विद्यार्थ्यांनी आपल्या युझर आयडीमधून आपला प्रवेश अर्ज भरणेचा आहे.

३. प्रवेश अर्ज व शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर केल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेश अर्जाच्या एक प्रतीवर स्वाक्षरी करावी.

३. विद्यार्थ्यांनी प्रवेशाअर्जासोबत शेवटच्या परीक्षेची (Last Appearance) व पात्रता पूर्ण करीत असलेल्या कागदपत्रांची स्वसांक्षाकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांनी प्रवेश ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज व कागदपत्रे तात्काळ विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. अ. क्र. ७ नुसार कागदपत्रे विहित मुदतीत सादर न केल्यास आपला प्रवेश निश्चित समजला नाही.

५. पदवी (बी.ए., बी.कॉम.) प्रथम वर्षासाठी भरलेल्या विद्यार्थ्यांनी १२ वी उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. एम.ए. एम.कॉम., एम. एस्सी. (गणित) साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी पात्रता समकक्ष असलेली पदवी उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची प्रत जोडणे आवश्यक आहे.

७. सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेशअर्जासोबत संस्थातर दाखला, स्थलांतर दाखला, आधार कार्ड, ए.बी.सी. आयडीची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

८. विद्यार्थ्यांनी प्रवेशअर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा उल्लेख प्रवेशअर्जावर नमूद करावा.

९. प्रवेश अर्जासोबत गुणपत्रक, संस्थातर दाखला, स्थलांतर दाखला व ए.बी.सी. आयडीची प्रत न जोडल्यास त्यानी याबाबतची पूर्तता प्रवेश अर्ज सादर केल्यापासून एक महिन्याच्या आत सादर करावी अन्यथा आपला प्रवेश अंतिम होणार नाही अथवा आपला प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१०. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी दूरशिक्षण माध्यमातून प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यानी विद्यापीठातील टी.सीचा अर्ज मॅन्युअली पध्दतीने भरून तो अर्ज विद्यार्थी सुविधा केंद्राकडे सादर करणेचा आहे.

११. विद्यार्थ्यांनी निवडलेले अभ्यासकेंद्र हेच शक्यतो परीक्षा केंद्र म्हणून दिले जाते. तथापि परीक्षा केंद्र देण्याचा अंतिम संपूर्ण अधिकार हा विद्यापीठाकडे राहिल याची नोंद घ्यावी.

१२. विद्यार्थ्यांनी आपल्या लॉगीनमधून प्रवेश अर्ज व शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर करणेचा आहे. इतर माध्यमातून प्रवेश व शुल्क भरल्यास तो ग्राहय अथवा स्वीकाराला जाणार नाही अथवा त्यांचा प्रवेश निश्चित समजला जाणार नाही.

१३. विद्यार्थ्यानी आपले प्रवेश अर्ज ऑनलाईन भरताना आपले नाव शेवटच्या गुणपत्रकावर असेल त्याप्रमाणे भरावे. तसेच आपला पत्ता, अभ्यासकेंद्राचे नाव, ई मेल आयडी, मोबाईल क्रमांक, अभ्यासक्रम, आधार क्रमांक, विषय, आधारकार्ड, ए. बी. सी. आयडी क्रमांक (नसेल तर डिजी लॉकर ॲप माध्यामातून काढून घ्यावी ) अचूक पध्दतीने काळजीपूर्वक भरावे.

१४ विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेश, पात्रता, परीक्षा व इतर अनुषंगिक बाबीसंदर्भात आपल्या अभ्यासकेंद्राशी समन्वय साधून पूर्तता करणेची आहे.

१५. प्रवेश, पात्रता, परीक्षा व इतर अनुषंगिक बाबीसंदर्भातील परिपत्रके व सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवल्या जात असतात. विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश झाल्यानंतर सदरच्या बाबीसंदर्भात विद्यापीठ संकेतस्थळवरून माहिती घेणे आवश्यक आहे.

१६. मुख्यालयात विषयनिहाय तज्ञ कार्यरत असून विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीसंदर्भात ऑनलाईन पध्दतीने विषयनिहाय समुपदेश केले जाते. यासाठी विद्यार्थ्यांनी व्हॉटसअॅप ग्रुपच्या माध्यामातून विषयनिहाय शैक्षणिक मार्गदर्शनासाठी व इतर सूचनासंदर्भात सहभागी व्हावे.

१७. दुहेरी पदवी योजनेअंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दुहेरी पदवीचा अर्ज व शुल्क भरणे आवश्यक आहे. दुहेरी पदवीवर आवश्यक ठिकाणी इतर ठिकाणी प्रवेश घेतलेल्या संस्थेचे प्राचार्य यांची सही व शिक्का घेवून तो अर्ज व शुल्क पावती या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या कार्यालयात विहित मुदतीत सादर करावा.

१८. प्रवेश अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे

- पात्रतेनुसार गुणपत्रकाची छायाकिंत प्रत
- संस्थातर दाखला (Transfer Certificate)
- स्थलांतर दाखला (Migration Certificate) (लागू असलेस)
- संस्थातर दाखला, स्थलांतर दाखला नसल्यास १ महिन्याचे आत सादर करणेबाबत हमीपत्र
- आधार कार्ड
- ए. बी. सी आयडीची प्रत (नसेल तर डिजी लॉकर अॅप माध्यामातून काढून घ्यावी )
- प्रवेश अर्ज व शुल्काची पावती
- दुहेरी पदवी अंतर्गत प्रवेश घेतला असेल तर दुहेरी पदवीची ऑनलाईन अर्जाची परिपूर्ण अर्ज, आवश्यक कागदपत्रासह व शुल्काची प्रत.